महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

## पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे-२०१९-२०

# प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-४

(FCFS- First Come First Serve)-3.

**दि.१४.१०.२०१९.**

## अंतिम प्रवेश फेरी

----------

इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० साठी ०१ बायफोकल फेरी, ०३ नियमित फे-या, ०१ विशेष फेरी व प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-०३ फेरी अशा एकूण ०८ फे-या झालेल्या आहेत. अद्यापपर्यंत ९५ टक्के पेक्षा जास्त प्रवेश पूर्ण झालेले आहेत, शासनानचे दि. १०.१०.२०१९ च्या पत्रानुसार अद्याप काही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित असल्यामुळे प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve)-4 या तत्त्वानुसार प्रवेश प्रक्रिया विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावर ऑनलाईन पध्दतीने राबविण्याचे शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे यांच्या कार्यालयात **दि.१५.१०.२०१९ रोजी सकाळी १०.३० ते दि. १७.१०.२०१९ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) ज्या विद्यार्थ्यांनी अजुनपर्यंत कुठेच प्रवेश घेतला नाही आणि त्यापुढे प्रवेश घेऊ इच्छित आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.** तथापि प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतःचे कागदपत्रे घेऊन उपस्थित राहवे. यानंतर कोणत्याही प्रकारची प्रवेश फेरी होणार नाही, सदरची फेरी अंतिम फेरी असणार आहे, याची पालक व विद्यार्थी यांनी दक्षता घ्यावी.

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(प्रविण अहिरे)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१



Scanned by CamScanner